नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०९/११/२०२६ (सोमवार)

पोलीस स्टेशन पाचगाव हद्दीतील सुकासा फार्म हाऊस येथील पहाटे डि.जे. लावुन सुरू असलेल्या पार्टीवर कारवाई; १६ लाख ५३ हजाराचा मुद्देमाल जप्त, ३ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

पोलीस स्टेशन पाचगाव :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाचगाव यांच्या नेतृत्वात पाचगाव पोलीसांनी पोलीस स्टेशन पाचगाव हद्दीतील मौजा शिवणी रिठी परिसरातील सुकासा फार्म हाऊस येथे पहाटेच्या सुमारास सुरू असलेल्या विनापरवानगी पार्टीवर कारवाई केली. या कारवाईत डीजे साउंड सिस्टिम, जनरेटर, पिकअप वाहन, विविध इलेक्ट्रॉनिक साहित्य व इतर साहित्य असा एकूण १६,५३,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला तसेच ३ आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक ०९/११/२०२६ रोजी पहाटे ०४:३० वाजताच्या सुमारास पाचगाव पोलीस रात्र गस्त ड्युटीवर असताना त्यांना गोपनिय बातमीदारामार्फत मौजा शिवणी रिठी येथील सुकासा फार्म हाऊस येथे विनापरवानगी डीजे लावुन नाचगाणे सुरू असल्याची माहिती मिळाली. सदर माहितीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता जनरेटर, अशोक लेलँड कंपनीची पिकअप गाडी, मोठे बास साउंड बॉक्स, टोन बॉक्स, ॲम्प्लिफायर, मॉनिटर, पॉवर ट्रॉली, एलईडी पार लाईट, एलईडी स्ट्रोब, मिक्सर, कन्सोल, स्मोक मशीन, पार लाईट, क्रॉसर, स्प्लिटर, ३ प्लेअर, लॅपटॉप, आणि इतर साहित्य मिळुन आले. तसेच घटनास्थळी विदेशी दारूच्या रिकाम्या आणि अर्धवट भरलेल्या बाटल्याही मिळुन आल्याने किंमती १६,५३,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी आरोपी १) नितेश विलास शेंबेकर, रा. हुडकेश्वर, नागपूर (सुकासा फार्म हाऊस मालक) २) फिरोज जमील शेख, वय ३० वर्षे, रा. हनुमान वॉर्ड, भंडारा (पार्टीचे आयोजक) आणि ३) विनय पृथ्वीराज हिरेखन, वय ३२ वर्षे, रा. इंदोरा चौक, नागपूर (डि.जे मालक) यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन पाचगाव येथे कलम २२३, ३(५), भान्यासं सह

कलम ६८ महाराष्ट्र दारूबंदी कायदा तसेच कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस स्टेशन पाचगाव करीत आहेत.

नागपूर ग्रामीण पोलीस दलाकडून विनापरवानगी पार्टी, ध्वनिप्रदूषण तसेच कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या आयोजकांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येत असून, नागरिकांनी कायद्याचे पालन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

दिवाळीनिमित्त नागपूर ग्रामीण पोलीस दलाचा सामाजिक बांधिलकीचा उपक्रम; गरजू कुटुंबे, निराधार ज्येष्ठ नागरिक व बालकांसोबत साजरा केला दिवाळीचा आनंद

दिवाळी हा आनंद, उत्साह आणि आपुलकीचा सण असून या सणाचा आनंद समाजातील प्रत्येक घटकाला मिळावा, या उद्देशाने नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने दिवाळीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. समाजातील ज्येष्ठ नागरिक तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू कुटुंबांसोबत दिवाळी साजरी करून नागपूर ग्रामीण पोलीसांनी सामाजिक बांधिलकी जपली. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण तसेच मा. श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनच्या वतीने हे उपक्रम राबविण्यात आले.

पोलीस स्टेशन भिवापूर :—भिवापूर पोलीस स्टेशनच्या वतीने भिवापूर शहरातील प्रेमनगर परिसरातील हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगणाऱ्या गरजू कुटुंबांना तसेच निराधार ज्येष्ठ नागरिकांना मिठाई व भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. तसेच परिसरातील लहान मुलांना भेटवस्तु वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यात आला. या उपक्रमातून गरजू कुटुंबे व निराधार ज्येष्ठ नागरिकांसोबत दिवाळीचा आनंद साजरा करत त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

पोलीस स्टेशन मौदा :— मौदा पोलीस स्टेशनच्या वतीने निराधार वृध्द महिलांना दिवाळीनिमित्त नवीन वस्त्र, भेटवस्तू व मिठाईचे बॉक्स वितरित करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून निराधार महिलांसोबत दिवाळीचा आनंद साजरा करून त्यांच्याप्रती आपुलकी व सामाजिक बांधिलकी व्यक्त करण्यात आली.

पोलीस स्टेशन खापा :— खापा पोलीस स्टेशनच्या वतीने खापा येथील घरकुल परिसरातील आर्थिकदृष्ट्य दुर्बल कुटुंबांना तसेच लहान मुलांना मिठाई वाटप करून त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमातून गरजू कुटुंबे व लहान मुलांसोबत दिवाळीचा आनंद साजरा करण्यात आला.

पोलीस स्टेशन वेलतुर :—वेलतुर पोलीस स्टेशनच्या वतीने जीवनापूर परिसरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल वृध्द नागरिकांना मिठाई व जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देऊन त्यांच्यासोबत सणाचा आनंद साजरा करण्यात आला.

पोलीस स्टेशन केळवद :— केळवद पोलीस स्टेशनच्या वतीने कवठा येथील निराधार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना दिवाळीनिमित्त मिठाई व जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी नागरिकांना दिवाळीच्या शुभेच्छा देऊन त्यांच्यासोबत सणाचा आनंद साजरा करण्यात आला. या उपक्रमातून गरजू नागरिकांप्रती आपुलकी, संवेदनशीलता व सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला.

पोलीस स्टेशन अरोली :— अरोली पोलीस स्टेशनच्या वतीने पिंपळगाव येथील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना दिवाळीनिमित्त मिठाई व भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी त्यांच्याशी संवाद साधून दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमाच्या माध्यमातून गरजू कुटुंबीयांसोबत दिवाळीचा आनंद द्विगुणित करत पोलीस दलाने आपली सामाजिक बांधिलकी जपली.

अशा प्रकारे नागपूर ग्रामीण पोलीस दलातील विविध पोलीस स्टेशनच्या वतीने समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून दिवाळीचा आनंद वाटण्यात आला. केवळ कायदा व सुव्यवस्था राखण्यापुरते मर्यादित न राहता समाजातील गरजू, ज्येष्ठ नागरिक आणि बालकांच्या आनंदात सहभागी होऊन पोलीस दलाने सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला.









जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर